**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीसाठीच्या प्रचाराच्या तोफा थंडावल्या, बुधवारी होणाऱ्या मतदानासाठी यंत्रणा सज्ज

- महाराष्ट्रात आचारसंहिता लागू झाल्यापासून ८० हजार जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई, ६६० कोटी रुपयांहून अधिक मालमत्ता जप्त

- महायुती आणि महाविकास आघाडीकडून विधानसभा निवडणुकीत बहुमत मिळण्याचे दावे

**आणि**

- महाराष्ट्रातले ७ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सत्ताधारी महायुतीमुळे इतर राज्यात गेल्याचा राहुल गांधी यांचा आरोप, धारावीकरांना पुनर्विकासानंतर तिथंच घरं देण्याचं भाजपाचं आश्वासन

**<><><><><>**

महाराष्ट्रात, विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक आणि नांदेड लोकसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी आज संध्याकाळी थांबली. राज्यात यंदा ९ कोटी ७० लाखांहून अधिक मतदार २८८ आमदारांना निवडून देणार आहे. त्यांच्यासाठी १ लाख ४२७ मतदान केंद्रं उभारली असून दुर्गम भाग वगळता इतर ठिकाणी सकाळी ७ ते संध्याकाळी ६ पर्यंत मतदान होईल.

विधानसभा निवडणुकीसाठी यंदा ४ हजार १३६ उमेदवार रिंगणात असून नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी १९ उमेदवार पात्र ठरले आहेत.

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्यात सुमारे ८० हजार जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई झाली. ५६ हजारांहून अधिक शस्त्र जमा केली असून ६११ शस्त्र परवाने रद्द झाले आहेत. तर, ६६० कोटी रुपयांहून अधिक रकमेची मालमत्ता जप्त झाली आहे. त्यात १५३ कोटी रुपयांहून अधिक रोख, २८२ कोटी रुपयांहून अधिक रकमेचे मौल्यवान धातू यासह इतर गोष्टींचा समावेश आहे.

**<><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीचाही प्रचार आज संपला. या टप्प्यात ३८ मतदारसंघामधे येत्या २० तारखेला मतदान होणार आहे. १५० हून अधिक उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. विविध पक्षांच्या नेत्यांनी आज प्रचारसंभांचा धडाका लावला. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या नेत्यांनी त्यांच्या प्रचारसभांमधून हेमंत सोरेन सरकारचा  कथित भ्रष्टाचार, बांगलादेशी घुसखोरी, बेरोजगारी, आणि मासिक निधी हस्तांतरण योजना इत्यादी मुद्यांवर भर दिला. तर इंडिया आघाडीच्या नेत्यांनी  महिलांसाठी रोख रक्कमेची हमी, बेरोजगारी, झारखंडबाबत केंद्रसरकारचा कथित पक्षपात, आणि अपुरा निधी इत्यादी मुद्यांवर भर दिला.

**<><><><>**

उत्तर प्रदेशातल्या विधानसभेच्या नऊ जागांवरल्या  पोटनिवडणुकीसाठीचा प्रचार आज संपला. आजच्या शेवटच्या दिवशी विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी

प्रचारसभा, रोड शो यांच्या माध्यमातून मतदारांना आपापले उमेदवार निवडून देण्याचं आवाहन केलं. २० नोव्हेंबर रोजी या जागांसाठी मतदान होणार आहे.

<><><><><>

महाविकास आघाडीनं अनेक विकासकामांमध्ये अडथळे आणल्यामुळे लाखो रोजगारांवर गदा आली असा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केला. मुंबईत झालेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. कोविड काळातही महाविकास आघाडीनं भ्रष्टाचार केल्याचा आरोप त्यांनी केला.

तर, महायुती सरकारच्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याच नगरविकास खात्यात घोटाळा झाल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी आज केला. मुंबई शहरात मेट्रोमार्गासाठी बसवलेल्या खांबांवर अनेक ठिकाणी अद्याप गर्डर टाकणं बाकी असताना त्याचं रंगकाम केलं आहे. यासाठी ७४ कोटी ४१ लाख रुपयांचा खर्च केल्याचा आरोप ठाकरे यांनी केला.

<><><><><>

जगात भारत पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. आता महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन इतकी बनवायची असेल तर महायुतीला मतदान करावं, असं आवाहन केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी आज नवी मुंबईत केलं.

<><><><><>

महायुती सरकारच्या काळात शेतकरी, कामगार, तरुण, महिला यांचं जगणं कठीण झालं आहे, महागाई आणि बेरोजगारी प्रचंड वाढली आहे, अशी टीका करत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी महाविकास आघाडीला विजयी करण्याचं

आवाहन केलं. ते वसई इथं प्रचारसभेत बोलत होते. भाजपा समाजामध्ये फूट पाडण्याचं काम करत असून काँग्रेस जोडण्याचं काम करत आहे, असं खर्गे म्हणाले.

**<><><><><>**

संविधान बदलणं हा भाजपाचा हेतू असून, संविधानाला धक्का लागला तर नागरिकांचे मूलभूत अधिकार धोक्यात येतील, असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते आज बारामती इथं विधानसभा निवडणूक प्रचाराच्या सांगता सभेत बोलत होते.

आपल्या सत्ताकाळात आपण कारखाने, एमआयडीसी उभारून हजारो रोजगार निर्माण केले. मात्र महायुती सरकारच्या काळात राज्यात येऊ घातलेले उद्योग गुजरातला नेण्यात आले असा आरोप पवार यांनी केला.

**<><><><><>**

महायुतीला जनतेचा कौल असल्यानं युतीच्या १६५ पेक्षा जास्त जागा निवडून येतील आणि सरकार आपलंच येईल, असा विश्वास भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. नागपूरात ते वार्ताहरांशी बोलत होते.

**होल्ड - बाईट –बावनकुळे**

**<><><><><>**

राज्यातलं महायुती सरकार असंविधानिक आणि भ्रष्टाचारी असून महायुतीला सत्तेवरुन खाली खेचणं हे पहिलं उद्दिष्ट असल्याचं प्रतिपादन काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी केलं आहे. ते आज संगमनेर इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. राज्यात सर्वत्र महायुती सरकार बद्दल प्रचंड राग असून, या निवडणुकीत १८० जागा जिंकून महाविकास आघाडी सत्ता स्थापन करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

राज्यातल्या ५ लाख युवांना रोजगार देण्याची क्षमता असलेले ७ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सत्ताधारी महायुतीमुळे महाराष्ट्रातून गुजरातला गेल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत रोजगार, महागाई, महिलांचे प्रश्न यासह महाराष्ट्राची संपत्ती महाराष्ट्राच्या जनतेला मिळणं हेच महत्त्वाचे मुद्दे आहेत, असं ते म्हणाले. धारावीचा पुनर्विकास स्थानिकांचं हित लक्षात घेऊन केला जाईल, असं त्यांनी सांगितलं....

**होल्ड बाईट- राहुल गांधी**

**<><><><><>**

धारावीचा पुनर्विकास झाल्यानंतर तिथल्या सर्व रहिवाशांना धारावीतच घर देण्यात येईल, असं भाजपा नेते विनोद तावडे यांनी सांगितलं. धारावीतल्या लोकांना विस्थापित करण्यात येणार आहे, या काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या आरोपांना उत्तर देताना ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. धारावीची जमीन अदानी समूहाला दिली जाणार नाही, ती राज्य शासनाच्याच ताब्यात राहील, असं तावडे यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

नागपूरचा सर्वांगिण विकास करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून सबका साथ, सबका विकास हेच आपलं ध्येय आहे, असं प्रतिपादन भाजपा नेते, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या नागपूर इथं आयोजित सांगता सभेत ते बोलत होते.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी पक्ष सत्ता, यंत्रणा आणि पैशाचा गैरवापर करत असल्याचा आरोप काँग्रेसनं केला आहे. यात सर्वात जास्त पोलीस दलाचा वापर होत असून निवडणूक आयोगाने याची तात्काळ दखल घेऊन हस्तक्षेप करावा, अशी मागणी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केली आहे.

**<><><><>**

श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमार दिसनायके पुढच्या महिन्यात भारत दौऱ्यावर येणार आहेत. श्रीलंकेचे नवनियुक्त परराष्ट्रमंत्री विजिता हेरथ यांनी आज बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली. भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी गेल्या महिन्यात त्यांच्या श्रीलंका दौऱ्यात दिसनायके यांना भारत भेटीचं आमंत्रण दिलं होतं. डिसेंबरच्या मध्यावर अपेक्षित असलेल्या या दौऱ्यात दिसनायके भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करतील, असं हेरथ यांनी सांगितलं.

**<><><><>**

राष्ट्रीय युवक महोत्सव पुढच्या वर्षी ११ आणि १२ जानेवारी २०२५ रोजी विकसित भारत युवा नेतृत्व संवाद म्हणून साजरा केला जाणार आहे. केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय यांनी आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. या मंचामुळे देशातल्या युवकांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधण्याची आणि आपला दृष्टीकोन त्यांच्यासमोर मांडण्याची संधी मिळणार आहे. देशभरातल्या युवकांमधून प्रतिभा शोधणं आणि तिचा विकास करणं हा यामागचा हेतू आहे, असं मांडवीय यांनी सांगितलं.

**//<><><><>//**